**ठळक बातम्या**

- संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ऑपरेशन सिंदूरसह इतर मुद्द्यांवर प्रधानमंत्र्यांनी निवेदन करावं अशी विरोधी पक्षांची सर्वपक्षीय बैठकीत मागणी

- वादग्रस्त न्यायमूर्ती वर्मांवर महाभियोग चालवण्याच्या प्रस्तावाला सर्व पक्षांची संमती मिळवण्याचा प्रयत्न असल्याचं संसदीय कार्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- इंधन तेल खाणींचा शोध घेण्यासाठी १० लाख चौरस किलोमीटर समुद्री क्षेत्र खुलं केल्याची पेट्रोलियम मंत्र्यांनी दिली माहिती

**आणि**

- मलेरिया प्रतिबंधक लस संशोधन प्रगतीपथावर

**<><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने नवी दिल्लीत संसद भवन इथं सर्वपक्षीय बैठक बोलावली होती.

अधिवेशनात प्रधानमंत्र्यांनी संसदेत महत्त्वाच्या विषयांवर निवेदन द्यावं अशी मागणी काँग्रेसने या बैठकीत केल्याचं गौरव गोगोई यांनी बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. ऑपरेशन सिंदूर दरम्यान ५ विमानं पाडली गेल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. त्यावर आणि पहलगाममधल्या सुरक्षेतल्या त्रुटीवर बोलावं, अशी मागणी काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने सरकारला केली आहे. तसंच अहमदाबाद विमान दुर्घटना, दिल्लीच्या मद्रासी कँपमधे बुलडोझर इत्यादी बाबींवर सरकारने स्पष्टीरकण द्यावं असं खासदार संजय सिंह म्हणाले. तर बिजेडीचे खासदार सस्मित पात्रा यांनी ओदिशात कायदा सुव्यवस्था कोलमडल्याचा आरोप बैठकीत केला. या बैठकीला केंद्रीय मंत्री आणि राज्यसभेतले नेते जे पी नड्डा, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि डॉ एल मुरूगन उपस्थित होते. याशिवाय, काँग्रेसचे गौरव गोगोई, प्रमोद तिवारी, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव, द्रमुकचे तिरुची सिवा

आणि टी आर बालु, आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

संसदेचं पावसाळी अधिवेशन उद्यापासून सुरू होणार असून ते २१ ऑगस्टपर्यंत चालेल. या अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या २१ बैठका होतील. या अधिवेशनात जनविश्वास सुधारणा विधेयक २०२५, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ सभागृहात चर्चेला येण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरात रोकड सापडल्याच्या प्रकरणानंतर, त्यांना पदावरून हटवण्यासाठीच्या महाभियोग प्रस्तावावर सर्व राजकीय पक्षांनी स्वाक्षरी करणं आवश्यक असल्याचं, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं आहे. याबाबत आपण समन्वय साधत असून, विविध राजकीय पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांशी बोलणं केलं असल्याचंही त्यांनी सांगितलं. ज्या पक्षांचे केवळ एकच खासदार आहेत, त्यांच्याशीही संपर्क साधणार असून, त्यातून संसदेचं एकमत दिसून येईल असं ते म्हणाले.

न्यायव्यवस्थेतला भ्रष्टाचार हा अत्यंत संवेदनशील आणि गंभीर मुद्दा असल्याची बाबही त्यांनी या मुलाखतीत अधोरेखित केली.

**<><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अनुषंगानं इंडिया आघाडीच्या नेत्यांची काल दूरस्थ पद्धतीनं बैठक झाली. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, द्रमुक, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष इत्यादी पक्षांचे नेते यामध्ये सहभागी झाले होते. या बैठकीला उपस्थित असलेल्या प्रमुख नेत्यांमध्ये काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सपाचे रामगोपाल यादव आणि द्रमुकच्या तिरुची शिवा यांचा समावेश होता. अधिवेशनात पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर सारखे मुद्दे उपस्थित करण्यावर सर्व नेत्यांची सहमती झाल्याचं काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं.

दरम्यान, आम आदमी पक्ष, इंडिया आघाडीमधून बाहेर पडला असल्यानं या बैठकीत सहभाग घेतला नाही. ही आघाडी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी करण्यात आली होती, त्यानंतर आम आदमी पक्षानं हरियाणा आणि दिल्ली विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवली, अशी माहिती आपचे नेते संजय सिंह यांनी काल माध्यमांना दिली.

**<><><><>**

गेल्या दशकभरात भारतातली सुमारे २४ कोटी जनता सर्व प्रकारच्या गरिबीतून बाहेर पडली असून त्याच काळात सामाजिक सुरक्षा योजनांचा आवाका दुपटीहून अधिक वाढला असल्याचं नीती आयोगाचे अध्यक्ष सुमन बेरी यांनी म्हटलं आहे. अमेरिकेत न्यूयॉर्क इथं संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुख्यालयात आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. देशाने शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये केलेल्या प्रगतीच्या मुळाशी सामाजिक सुरक्षा छत्र आणि विकासाभिमुख सुधारणा असल्याचं ते यावेळी म्हणाले.

वीजनिर्मितीमधला नवीकरणीय स्रोतांचा वाटा ५० टक्क्यांपर्यंत पोचवण्याचं उद्दिष्ट मुदती आधीच पूर्ण झालं असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

शाश्वत विकास उद्दिष्टांच्या २०२५ च्या जागतिक अहवालात भारत १६७ देशांमधून ९९ क्रमांकाच्या स्थानावर असून या क्रमवारीत भारताने पहिल्या १०० देशांच्या यादीत प्रथमच प्रवेश मिळवला आहे.

**<><><><>**

मानवाने चंद्रावर पहिलं पाऊल टाकलं त्या दिवसाच्या निमित्ताने आज आंतरराष्ट्रीय चंद्र दिन साजरा केला जात आहे. १९६९ मध्ये अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था नासाने अपोलो ११ मोहीम आखली होती. २० जुलै १९६९ रोजी नील आर्मस्ट्रॉंग यांनी चंद्रावर पहिलं पाऊल ठेवलं. या दिवसाच्या स्मरणार्थ संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने २०२१मध्ये या दिवसाची अधिकृत घोषणा केली. या दिवसाच्या निमित्ताने जगभरात विविध उपक्रम, आकाशदर्शन, विज्ञानावर आधारित स्पर्धांचं आयोजन अशा विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे.

**<><><><>**

सद्यस्थितीत दहा लाख चौरस किलोमीटर इतका सागरी प्रदेश तेल इंधनाच्या खाणींच्या शोधासाठी खुला केला असल्याची माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी समाजमाध्यमांवरून दिली आहे. याबरोबरीनंच ९९ टक्के नो-गो क्षेत्र देखील अशा शोधासाठी खुलं केलं असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. उद्योजक आणि उद्योग क्षेत्रातल्या दिग्गजांनी भारतातील तेल इंधन आणि वायू इंधन उत्खनन क्षेत्रातील संधी चाचपडून पाहण्यासाठी हा उत्तम काळ असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. अशा प्रत्येक उपाययोजनांमधून भारत तेल इंधन क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या बाबतीत आत्मविश्वासानं आणि टप्प्याटप्प्यानं वाटचाल करत असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

भारतीय औषध संशोधन परिषद आणि राष्ट्रीय प्रतिकारशक्तीशास्त्र संस्थेचे शास्त्रज्ञ संयुक्तपणे मलेरिया प्रतिबंधक लस विकसित करत आहेत. या लशीचे नाव ॲडफॅल्सीवॅक्स असं असून सध्या तिच्या चाचणीदरम्यानचे निकाल आशादायक असून लवकरच ती सार्वत्रिक वापरासाठी उपलब्ध होऊ शकेल. ‘मेक इन इंडिया’ अंतर्गत संपूर्ण स्वदेशी संशोधनानं विकसित झालेल्या या लसीमुळे मलेरियाचा प्रसार कमी होईल तसंच मलेरिया निर्मूलनाला हातभार लागेल.

**<><><><>**

१६६व्या आयकर दिनाच्या उत्सवाचा भाग म्हणून मुंबईत आयकर विभागाने आज अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सायक्लोथॉनचं आयोजन केलं होतं. अभिनेता जॉन अब्राहम, क्रिकेटपटू शिवम दुबे, ॲथलेटिक अंजु बॉबी जॉर्ज हे या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सहभागी झाले होते. या कार्यक्रमात ४००हून अधिक जणांना सहभाग घेतला होता. पर्यावरणपूरक वाहतूक साधनांना प्रोत्साहन देण्यासाठी सायक्लोथॉनचं आयोजन केल्याचं मनोगत मुंबईतल्या आयकर विभागाच्या प्रमुख मालती श्रीधरन यांनी यावेळी व्यक्त केलं.

**<><><><>**

जगभरात आज ‘बुद्धिबळ दिन’ साजरा होत आहे. याच दिवशी १९२४ साली जागतिक बुद्धिबळ महासंघाची स्थापना झाली होती. बुद्धिबळाच्या खेळाचा वापर समावेशकता, प्रशिक्षण, सक्षमीकरण आणि मानसिक स्वास्थ्यासाठी व्हावा या हेतूने महासंघाने हे वर्ष ‘सामाजिक भानासाठी बुद्धिबळ वर्ष’ म्हणून घोषित केलं असून या वर्षीचा

विषय ‘प्रत्येक चाल महत्वाची’ असा आहे. बुद्धीबळाच्या खेळासारखाच, आयुष्यातला देखील प्रत्येक निर्णय आपल्या जीवनाला योग्य दिशा देऊ शकतो हे या बोधवाक्यातून दर्शवून द्यायचं आहे.

**<><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, इंग्लंडनं काल लॉर्ड्स मैदानावर पावसामुळं उशिरा सुरु झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताचा ८ गडी राखून पराभव करत मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. भारतीय महिलांनी २९ षटकांत आठ बाद १४४ धावा केला. यजमान संघाला २४ षटकांत ११५ धावांचं लक्ष्य देण्यात आलं, ते त्यांनी एकविसाव्या षटकात पार केलं. निर्णायक तिसरा सामना मंगळवारी खेळला जाईल.

**<><><><>**

पनवेल रेल्वे स्थानकावर काल एका परदेशी महिला प्रवाशाकडून दोन किलो वजनाचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. मंगला एक्सप्रेस मधून ३५ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ घेऊन जाणाऱ्या या नायजेरियन महिलेला बंगळुरु अंमली पदार्थ नियंत्रण विभाग आणि पनवेल रेल्वे पोलिसांनी राबवलेल्या संयुक्त अभियानात अटक करण्यात आली. पुढील चौकशी सुरु असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

**//<><><><>//**